**L. A. BILL No. XVI OF 2026.**

*A BILL*

*FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA SELF-FINANCED SCHOOLS (ESTABLISHMENT AND REGULATION) ACT, 2012.*

**सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक १६.**

**महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक १७ मार्च, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

२०१३ चा महा. १.

संक्षिप्त नाव.

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) (सुधारणा) अधिनियम, २०२६, असे म्हणावे.

सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या प्रास्ताविकेची सुधारणा.

२०१३ चा महा. १.

**२.** महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या प्रास्ताविकेतील, "यथास्थिति, उच्च प्राथमिक किंवा माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शाळेत" हा मजकूर वगळण्यात येईल.

सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या कलम २ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम २ मध्ये, पोट-कलम (१) मधील,-

(क) खंड (१-क) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईलः-

"(२-क) "आयुक्त" याचा अर्थ, शिक्षण आयुक्त, महाराष्ट्र राज्य, असा आहे;";

(ख) खंड (झ) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईलः-

१८८२ चा २.
१९५० चा २९.

"(झ) "नोंदणीकृत न्यास" याचा अर्थ, भारतीय न्यास अधिनियम, १८८२, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेला इतर कोणताही कायदा याच्या तरतुदींअन्वये धर्मादाय प्रयोजनांसाठी नोंदणी केलेला सार्वजनिक न्यास, असा आहे;";

(ग) खंड (त) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईलः-

"(त) "शाळेचा दर्जावाढ" याचा अर्थ, मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेचा उच्च प्राथमिक शाळेत, उच्च-प्राथमिक शाळेचा माध्यमिक शाळेत किंवा माध्यमिक शाळेचा उच्च माध्यमिक शाळेत किंवा याउलट क्रमाने दर्जावाढ, असा आहे.".

सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ३ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३ मध्ये,-

(क) पोट-कलम (१) मधील, "प्राथमिक किंवा उच्च प्राथमिक किंवा माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शाळा यांसारखी एखादी नवीन शाळा स्थापन करण्याची किंवा, यथास्थिति, विद्यमान शाळेचा, उच्च प्राथमिक किंवा माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शाळेत दर्जावाढ करण्याची" या मजकुराऐवजी, "प्राथमिक किंवा माध्यमिक किंवा माध्यमिक व उच्च माध्यमिक यांसारखी एखादी नवीन शाळा स्थापन करण्याची किंवा विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्याची" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(ख) पोट-कलम (४) वगळण्यात येईल.

सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या कलम १३ ची सुधारणा.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम १३ मध्ये, पोट-कलम (२) मधील, "रुपये पाच लाखांपेक्षा कमी नाही पण रुपये दहा लाखांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची" या मजकुराऐवजी, "दहा लाख रुपयांपेक्षा कमी नसेल, परंतु वीस लाख रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या द्रव्यदंडाची" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या कलम १८ ची सुधारणा.

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम १८ मध्ये, "राज्य शासन" या मजकुरानंतर, ", आयुक्त" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

१८६० चा ४५. २०२३ चा ४५.

सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या कलम २० ची सुधारणा.

**७.** मुख्य अधिनियमाच्या कलम २० मध्ये, "भारतीय दंड संहितेच्या कलम २१" या मजकुराऐवजी, "भारतीय न्याय संहिता, २०२३ याच्या कलम २ (२८)" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या अनुसूची-क ची सुधारणा.

**८.** मुख्य अधिनियमाला जोडलेल्या अनुसूची क मध्ये,-

(क) नोंद (२) मधील, "प्राथमिक किंवा उच्च प्राथमिक किंवा माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक" या मजकुराऐवजी, "प्राथमिक किंवा माध्यमिक किंवा माध्यमिक व उच्च माध्यमिक" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(ख) नोंद (५) मधील, "प्राथमिक ते उच्च प्राथमिक किंवा उच्च-प्राथमिक ते माध्यमिक किंवा माध्यमिक ते उच्च माध्यमिक" या मजकुराऐवजी, "प्राथमिक ते उच्च प्राथमिक किंवा उच्च प्राथमिक ते माध्यमिक किंवा माध्यमिक ते उच्च माध्यमिक किंवा याउलट क्रमाने" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या अनुसूची-ग ची सुधारणा.

**९.** मुख्य अधिनियमाला जोडलेल्या अनुसूची-ग मध्ये,—

(क) नोंद (क) मधील, "प्राथमिक किंवा उच्च प्राथमिक किंवा माध्यमिक किंवा यथास्थिति, उच्च माध्यमिक शाळा" या मजकुराऐवजी, "प्राथमिक किंवा माध्यमिक किंवा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(ख) नोंद (ग) मधील, "उच्च-प्राथमिक, माध्यमिक किंवा यथास्थिति, उच्च-माध्यमिक शाळेमध्ये" या मजकुराऐवजी, "उच्च-प्राथमिक, माध्यमिक, किंवा यथास्थिति, उच्च-माध्यमिक शाळेमध्ये, किंवा याउलट क्रमाने" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन.

स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर नवीन शाळा स्थापन करण्यासह, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी तरतुदी करणे, तसेच, अशी नवीन शाळा स्थापन करण्यासाठी किंवा विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या बाबी व प्रमाणके याबाबत सुयोग्य तरतुदी करणे, दाननिधी निर्माण करणे आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (२०१३ चा महा. १) अधिनियमित करण्यात आलेला आहे.

**२.** या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना, शासनास, काही तांत्रिक समस्यांना व व्यावहारिक अडचणींना तोंड द्यावे लागते. अशा समस्यांवर व अडचणींवर मात करण्याच्या दृष्टीने, उक्त अधिनियमामध्ये सुयोग्य सुधारणा करणे इष्ट आहे, असे शासनास वाटते.

**३.** (क) शासनाने, शालेय शिक्षण विभागाच्या प्रशासनाची क्षेत्रीय स्तरावरील देखरेख करण्यासाठी शिक्षण आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यालयाची स्थापना केलेली आहे आणि राज्यस्तरीय समितीचा अध्यक्ष म्हणून शिक्षण आयुक्ताकडे जबाबदारी सोपविलेली आहे. म्हणून, “आयुक्त” या संज्ञेची नवीन व्याख्या समाविष्ट करण्याचे आणि त्यासाठी परिणामस्वरूप सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे.

(ख) महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम (१९५० चा २९) याच्या तरतुदींअन्वये नोंदणी केलेल्या धर्मादाय विश्वस्त संस्था, विद्यमान तरतुदींअन्वये राज्यात नवीन शाळा स्थापन करण्यासाठी अर्ज करण्यास पात्र आहेत. भारतीय न्यास अधिनियम, १८८२ (१८८२ चा २) या अन्वये आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याअन्वये नोंदणी केलेल्या सार्वजनिक न्यासांना, उक्त अधिनियमान्वये शाळा स्थापन करण्यासाठी अर्ज करण्यास मुभा देता यावी म्हणून “नोंदणीकृत न्यास” या संज्ञेच्या व्याखेत सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे.

(ग) विद्यमान शाळेमध्ये उच्च प्राथमिक किंवा माध्यमिक किंवा उच्च माध्यमिकइयत्तांची भर घालण्यासाठी शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी दिलेली आहे मात्र, माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शाळांमध्ये खालच्या इयत्तांची भर घालण्याची विद्यमान शाळेला, मुभा देण्यासाठी कोणतीही तरतूद केलेली नाही. माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शाळांमध्ये खालच्या इयत्तांची भर घालण्यासाठी विद्यमान शाळांना मुभा देता यावी म्हणून उक्त अधिनियमात आवश्यक सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे.

(घ) उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या पोट-कलम (४) मध्ये अनुसूची-क च्या नोंद (१२) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे शाळांचा दर्जावाढ करण्यासाठी आवश्यक असलेल्या जमिनीच्या शर्तीतून सूट देण्याबाबत तरतूद केली आहे. अशी तरतूद, वर्गखोल्या, प्रयोगशाळा, ग्रंथालय, स्वच्छताविषयक सुविधा, इत्यादी सारख्या पायाभूत सुविधाविषयक प्रमाणकांची पूर्तता करण्यामध्ये व्यवहार्य अडचणी निर्माण करते. म्हणून उक्त पोट-कलम (४) वगळण्याचे प्रस्तावित केले आहे.

(ङ) उक्त अधिनियमाच्या कलम १३ च्या पोट-कलम (१) अन्वये आवश्यक असलेली सूचना देण्यात कसूर केल्यास उक्त अधिनियमाच्या कलम १३ च्या पोट-कलम (२) मध्ये तरतूद केलेली द्रव्य दंडाची रक्कम वाढविण्याचे देखील प्रस्तावित केले आहे.

**४.** वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक ११ मार्च, २०२६.

**दादाजी भुसे,**
शालेय शिक्षण मंत्री.

## सन २०२६ चे वि.स.वि. क्र.१६-महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२६.

## (महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ यातील उतारे)

(सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १)

**ज्याअर्थी,** स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर नवीन शाळा स्थापन करणे तसेच विद्यमान शाळेचा यथास्थिति, उच्च प्राथमिक किंवा माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शाळेत दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याकरिता तरतुदी करणे, तसेच अशी नवीन शाळा स्थापन करण्यासह, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणे, त्याकरिता अर्ज मागविणे, याकरिता आवश्यक असणाऱ्या बाबी आणि प्रमाणके यासंबंधात योग्य त्या तरतुदी करणे, दाननिधी निर्माण करणे, अर्जाची छाननी करण्याच्या कार्यपद्धतीची तरतूद करणे आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींकरिता तरतुदी करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या त्रेसष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** ** ** **

**२.** (१) या अधिनियमात, संदर्भानुसार अन्य अर्थ अपेक्षित नसेल तर, व्याख्या.

"(१-क) "प्राधिकारी" याचा अर्थ, अधिनियमाच्या कलम ६ च्या पोट-कलम (१) अन्वये नियुक्त केलेले राज्यस्तरीय प्राधिकारी व क्षेत्रस्तरीय प्राधिकारी, असा आहे;";

(क) ते (ज) ** ** **

(झ) "नोंदणीकृत न्यास" याचा अर्थ, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम याच्या तरतुदींअन्वये धर्मादाय प्रयोजनांसाठी नोंदणी केलेला सार्वजनिक न्यास, असा आहे;

(ञ) ते (ण) ** ** **

(त) "शाळेचा दर्जावाढ" याचा अर्थ, मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेचा उच्च प्राथमिक शाळेत, उच्च प्राथमिक शाळेचा माध्यमिक शाळेत किंवा माध्यमिक शाळेचा उच्च माध्यमिक शाळेत दर्जावाढ, असा आहे.

(२) ** ** **

**३.** (१) प्राथमिक किंवा उच्च प्राथमिक किंवा माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शाळा यांसारखी एखादी नवीन शाळा स्थापन करण्याची किंवा, यथास्थिति, विद्यमान शाळेचा, उच्च प्राथमिक किंवा माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शाळेत दर्जावाढ करण्याची इच्छा असलेली कोणतीही नोंदणीकृत कंपनी किंवा नोंदणीकृत न्यास किंवा नोंदणीकृत संस्था किंवा स्थानिक प्राधिकरण, अनुसूची क मध्ये देण्यात आलेल्या नमुन्यात, अनुसूची ख मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कागदपत्रांसह, ऑनलाईन अर्ज सादर करील. राज्य शासन, वेळोवेळी, आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील अशा शुल्कासह अर्ज सादर करील. नवीन शाळा स्थापन करण्यासाठी किंवा विद्यमान शाळेचा दर्जावाढ यासाठी अर्ज करणे.

(१क) ** ** **

(२) व (३) ** ** **

(४) अनुसूची 'क' च्या नोंद (१२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या जमिनीच्या क्षेत्रासंबंधातील अट, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ या अन्वये आवश्यक असलेली मानके व प्रमाणके यांचे अनुपालन करणाऱ्या शाळांच्या दर्जावाढीच्या प्रस्तावांना लागू असणार नाही.

(५) ** ** **

**४. ते १२.** ** ** **

या अधिनियमांर्गत येणारी कोणतीही शाळा बंद करता न येणे.

**१३.** (१) या अधिनियमात अन्यथा केलेली तरतूद वगळता, शाळेच्या व्यवस्थापनाचा सचिव किंवा व्यवस्थापक किंवा शाळेचा कारभार पाहणारी व कोणत्याही पदाने संबोधली जाणारी कोणतीही व्यक्ती यांनी शाळा बंद करण्याचा अथवा तिचे काम खंडित करण्याचा व्यवस्थापनाचा उद्देश दर्शविणारी संबंधित शिक्षण संचालक आणि राज्य शासन यांना अठरा महिन्यांपेक्षा कमी नाही इतक्या कालावधीसाठी पूर्वसूचना दिल्याखेरीज या अधिनियमाखाली स्थापन केलेली किंवा दर्जावाढ केलेली कोणतीही शाळा बंद करता येणार नाही किंवा तिचे काम खंडित करता येणार नाही. अशी सूचना मिळाल्यानंतर संचालक, त्याला योग्य वाटल्यास स्वविवेकानुसार सचिव, व्यवस्थापक किंवा यथास्थिति, शाळेचा कारभार पाहणारी अशी व्यक्ती यांना आपले म्हणणे समक्ष भेटून मांडण्याची संधी देईल. त्यानंतर शाळा बंद करणे किंवा तिचे काम खंडित करणे समर्थनीय असल्याचे संचालकाचे मत झाले तर, तो बाधित विद्यार्थ्यांची सोय करण्याबाबत उचित कार्यवाही करण्याचे राज्य शासनाला कळवील. शासन अशा बंद होणाऱ्या शाळेतील विद्यार्थ्यांची सोय नजिकच्या उपलब्ध शाळेत करण्याबाबत यथोचित कार्यवाही करील.

(२) पोट-कलम (१) अन्वये आवश्यक असणारी पूर्वसूचना देण्यास असा कोणताही सचिव, व्यवस्थापक किंवा शाळेचा कारभार पाहणारी व्यक्ती कसूरदार ठरली तर, अपराध सिद्ध झाल्यावर तिला रुपये पाच लाखांपेक्षा कमी नाही पण रुपये दहा लाखांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा करण्यात येईल.

**१४.** ते **१७.** ** ** **

आदेश अंतिम असणे.

**१८.** या अधिनियमात अन्यथा स्पष्टपणे केलेली तरतूद वगळता, राज्य शासन किंवा संबंधित संचालक यांनी घेतलेला प्रत्येक निर्णय, काढलेला आदेश किंवा दिलेली सूचना किंवा निदेश अंतिम असेल.

**१९.** ** ** **

अधिकारी इत्यादी लोकसेवक असणे.

**२०.** या अधिनियमाच्या तरतुदींनुसार किंवा नियमानुसार काम करणारा प्रत्येक अधिकारी किंवा कर्मचारी, भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थातर्गत लोकसेवक आहे असे मानण्यात येईल.

**२१.** ते **२४.** ** ** **

**अनुसूची क**

(कलम ३ पहा)

**अर्जाचा नमुना**

(१) ** ** **

(२) नवीन शाळा सुरू करण्यासाठी अर्जः प्राथमिक किंवा उच्च प्राथमिक किंवा माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक स्वतंत्रपणे किंवा त्यांच्यापैकी एक किंवा अनेक जोडून :

(३) व (४) ** ** **

(५) विद्यमान शाळेची श्रेणीवाढ : प्राथमिक ते उच्च प्राथमिक किंवा उच्च माध्यमिक ते माध्यमिक किंवा माध्यमिक ते उच्च माध्यमिक ] (विद्यमान शाळेचा डीआयएसई किंवा एसईएमआयएस क्रमांक द्यावा) :

(६) ते (२०) ** ** **

**अनुसूची ख** ** ** **

**अनुसूची ग**

(कलम ४(१) पहा)

| | | |
|---|---|---|
| (क) नवीन प्राथमिक किंवा उच्च प्राथमिक किंवा माध्यमिक किंवा यथास्थिति, उच्च-माध्यमिक शाळा स्थापन करण्यासाठी, - | (एक) ग्रामपंचायत भागात | रुपये किमान दोन लाख, |
| | (दोन) नगर परिषद, नगर पंचायत किंवा औद्योगिक नगरी भागात. | रुपये किमान तीन लाख, |
| | (तीन) महानगरपालिका भागात | रुपये किमान पाच लाख, |
| | (चार) मुंबई व मुंबई उपनगर भागात | रुपये किमान सात लाख; |
| (ख) ** | ** | ** |
| (ग) शाळेची उच्च प्राथमिक, माध्यमिक किंवा यथास्थिति, उच्च माध्यमिक शाळेमध्ये दर्जावाढ करण्यासाठी, - | (एक) ग्रामपंचायत भागात | रुपये किमान दोन लाख (प्रत्येक दर्जावाढ करण्याकरिता), |
| | (दोन) नगर परिषद, नगर पंचायत किंवा औद्योगिक नगरी भागात. | रुपये किमान तीन लाख (प्रत्येक दर्जावाढ करण्याकरिता), |
| | (तीन) महानगरपालिका भागात | रुपये किमान पाच लाख (प्रत्येक दर्जावाढ करण्याकरिता), |
| | (चार) मुंबई व मुंबई उपनगर भागात | रुपये किमान सात लाख (प्रत्येक दर्जावाढ करण्याकरिता). |

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२६ चे विधानसभा विधेयक  क्रमांक १६.]**

**[महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन अधिनियम, २०१२ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. दादाजी भुसे,**
शालेय शिक्षण मंत्री.**]**

**[विधानसभेने दिनांक १७ मार्च, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**जितेंद्र भोळे,**
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई